धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, धैर्यलक्ष्मी,
शौर्यलक्ष्मी.. विद्यालक्ष्मी, कार्यलक्ष्मी,
विजयालक्ष्मी, राजलक्ष्मी...
या दिपावलीत अष्टलक्ष्मी तुमच्यावर
होवो धनवर्षाव,
धनत्रयोदशी आणि दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...!

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



धनत्रयोदशी

• वर्ष : ०४ • अंक : ०५६ • पुणे • शुक्रवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



चेहऱ्याच्या गंभीर फ्रॅक्चरवर तीन यशस्वी शस्त्रक्रिया

3



परदेशातील भारतीयांची दिवाळी होणार गोड

4

चक्का जाम आंदोलन मागे

पहिली उचल ३,९००, हंगाम संपताना १०० रुपये प्रतिटनाचा प्रस्ताव मान्य

पेठवडगाव (दै. आरंभ पर्व)

ऊस दरप्रश्नी गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनावर अखेर तोडगा निघाला असून, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी गुरुवारी रात्री उशिरा चक्का जाम आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा केली. साखर कारखानदारांनी प्रतिटन ४,२०० रुपये देण्याचा प्रस्ताव मान्य केला आहे. मात्र, ही रक्कम तीन टप्प्यांत देण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांत काही प्रमाणात नाराजी पसरली आहे. महामार्गावर अडकलेल्या प्रवाशांची दिवाळी आणि पोलिसांनाही कुटुंबासमवेत सण साजरा करता यावा, या भावनेतून आंदोलन मागे घेत असल्याचे शेट्टी यांनी स्पष्ट केले. कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी सायंकाळी झालेल्या बैठकीत शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी आणि साखर कारखानदार यांच्यात चर्चा झाली. यामध्ये कारखानदारांनी ३,९०० रुपये पहिली उचल, कारखाना बंद होताना १०० रुपये आणि पुढील गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी २०० रुपये, असे एकूण ४,२०० रुपये प्रतिटन देण्याचा प्रस्ताव दिला. शेतकऱ्यांना ४,२०० रुपये एकरकमी किंवा किमान दोन टप्प्यांत मिळावेत, अशी संघटनेची भूमिका होती. मात्र, तीन टप्प्यांतील प्रस्ताव स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. साखरेचा दर प्रतिक्विंटल ४,५०० रुपयांच्या पुढे गेल्यास वाढीव रकमेत ७० टक्के हिस्सा शेतकऱ्यांना, तर ३० टक्के हिस्सा कारखानदारांना मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शेट्टी म्हणाले, किमान ४,००० रुपये एकरकमी मिळावेत, अशी अपेक्षा होती. तीन टप्प्यांतील रक्कम मिळताना विलंब होणार आहे. मात्र, आंदोलन अधिक काळ सुरू ठेवल्यास त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागणार आहे. आंदोलनामुळे पुण्यापासून निपाणीपर्यंत महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या सर्व प्रवाशांची शेट्टी यांनी माफी मागितली. या निर्णयाच्या धर्तीवर सांगली आणि सातारा जिल्ह्यांतही तोडगा काढण्याचे निश्चित झाले. याबाबत संबंधित पालकमंत्र्यांशीही संपर्क साधण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनीही या प्रश्नात लक्ष घालून उर्वरित जिल्ह्यांतील आंदोलनावर तोडगा काढावा, अशी अपेक्षा शेट्टी यांनी व्यक्त केली. या निर्णयाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून अधिकृत लेखी पत्र देण्यात येणार असल्याचे सांगत शेट्टी यांनी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन चक्का जाम आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा केली. यानंतर पोलिसांनी पाचच मिनिटांत टोल नाका परिसर रिकामा करून वाहने मार्गस्थ केली.





जपानचा ४-१ ने धुव्वा उडवत भारताने कोरले सुवर्णपदकावर नाव

मुंबई (दै. आरंभ पर्व)

भारतीय पुरुष हॉकी संघाने अपराजित घोडदौड कायम ठेवत एशियन चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात जपानचा ४-१ असा धुव्वा उडवला आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. मोहालीच्या मैदानावर रंगलेल्या या रोमांचक सामन्यात सुरुवातीला पिछाडीवर पडल्यानंतर भारतीय खेळाडूंनी तिसऱ्या आणि चौथ्या क्वार्टरमध्ये तुफानी खेळ करत गोलचा पाऊस पाडला. या दिमाखदार विजयासह भारताने तब्बल सहाव्यांदा (२०११, २०१६, २०१८, २०२३, २०२४ आणि २०२६) एशियन चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे. सामन्याची सुरुवात जपानसाठी दमदार झाली. पहिल्याच क्वार्टरमध्ये तिसऱ्या मिनिटाला काझुमासा मात्सुमोतो याने मैदानी गोल करत जपानला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या आणि दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाला लय सापडत नव्हती. जपानने दुसऱ्या क्वार्टरमध्ये लागोपाठ पेनल्टी कॉर्नर मिळवले, परंतु भारतीय बचावफळीने त्यांचा प्रयत्न उधळून लावला.या महामुकाबल्यात भारताकडून शिलानंद लाक्रा, दिलप्रीत सिंग, जुगराज सिंग आणि विवेक सागर प्रसाद यांनी प्रत्येकी एक गोल डागला.

ठळक बातम्या

कमिशन देण्याच्या बहाण्याने फसवणूक

पुणे (आरंभ पर्व) : कंपनीचे उत्पादन भाडेतत्त्वावर देऊन त्यावर दररोज अडीच टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका व्यक्तीला ८७ लाख ५८ हजार रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने तक्रारदाराशी (वय ५९, रा. धनकवडी) संपर्क साधून एका नामांकित कंपनीचा एजंट असल्याचे सांगितले. कंपनीची उत्पादने भाड्याने दिल्यास चांगला नफा मिळतो, असे भासवून फिर्यादींना लिंक पाठवून लॉग-इन करण्यास सांगितले. जादा परताव्याच्या हव्यासापोटी फिर्यादींनी टप्प्याटप्प्याने ८७ लाख ५८ हजार रुपये विविध बँक खात्यांवर जमा केले. मात्र, मुद्दल अथवा परतावा न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. पोलिस निरीक्षक अमोल धस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मोबाईल हॅक करून लाखांची फसवणूक

पुणे (आरंभ पर्व) : एस आयआर अर्जामध्ये दुरुस्तीच्या बहाण्याने मोबाइलचा ॲक्सेस मिळवून वानवडी येथील ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची १९ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर चोरट्याने फिर्यादी यांच्या मोबाईलवर संपर्क साधून त्यांच्या 'एसआयआर' अर्जामध्ये वडिलांचे नाव जुळत नसल्याचे सांगितले. अर्ज भरून देण्याचे भासवून आरोपीने फिर्यादींच्या मोबाइलचा ॲक्सेस मिळवला. त्यानंतर फिर्यादींच्या बँक खात्यातून १९ लाख ४० हजार रुपये परस्पर स्वतःच्या खात्यावर वर्ग करून घेतले.

गुंतवणुकीच्या आमिषाने गंडा

पुणे (आरंभ पर्व) : शेअर बाजारात भरघोस परताव्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका तरुणाची आठ लाख ५७ हजार रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार तरुणाला (वय ३९, रा. विश्रांतवाडी) सायबर चोरट्यांनी एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडले होते. ग्रुपवर शेअर बाजारातील ट्रेडिंगद्वारे दररोज मोठा नफा मिळत असल्याचे भासवून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपींनी वेगवेगळ्या बँक खात्यांवर वेळोवेळी आठ लाख ५७ हजार रुपयांहून अधिक रक्कम भरण्यास भाग पाडले.

वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

पुणे (आरंभ पर्व) : भरधाव अवजड वाहनाच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. कात्रज येथील वर्धमान गार्डन सोसायटीसमोरील रस्त्यावर मंगळवारी रात्री साडेअकराच्या सुमारास हा अपघात झाला. मेहबूब युसूफ शेख (वय ३१, रा. श्रीराम कॉलनी, कात्रज) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

मुश्रीफांना मनी लॉंड्रिंग प्रकरणात मोठा दिलासा : ईडीची केस बंद

पुणे (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा कॅबिनेट मंत्री हसन मुश्रीफ यांना कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट पीएमएलए कोर्टाने स्वीकारला आहे. सुमारे शंभर कोटी रुपयांच्या या खटल्याच्या प्रकरणातून मुश्रीफांची सुटका झाली आहे. कोल्हापुरातील सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याशी संबंधित हे प्रकरण होते. या साखर कारखान्याचं भागधारक करण्याचं आश्वासन देऊन शेतकऱ्यांकडून मोठा निधी गोळा केल्याचा आरोप होता. खुद्द हसन मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांवर खटला दाखल करण्यात आलेला होता. २०२३ मध्ये शेतकऱ्यांकडून पैसे जमा केल्याचं हे प्रकरण होतं. या प्रकरणात ईडीने मुश्रीफांच्या घरावर तीनवेळा छापा टाकला होता. या प्रकरणी २०२५च्या जून महिन्यात मुंबई हायकोर्टाने मुरगूड पोलिस ठाण्यात दाखल केलेला गुन्हा रद्दही केला होता. तसेच नोव्हेंबर २०२५ मध्ये कंपनी नोंदणी कार्यालयाची तक्रार कोर्टाने रद्द ठरवली. या प्रकरणातील गुन्हे संपुष्टात आल्याने ईडीने पीएमएलए विशेष कोर्टामध्ये क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. कोर्टाने तो अहवाल स्वीकारत मुश्रीफांना दिलासा दिला आहे. हे प्रकरण सुमारे शंभर कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचे होते. हसन मुश्रीफ यांच्यासह त्यांच्या तीन मुलांची या प्रकरणातून सुटका झाली आहे.



दिवाळीच्या मुहूर्तावर पुणे पोलिसांची नागरिकांना अनोखी भेट!

परिमंडळ ४ मधील ४० हरवलेले मोबाईल शोधून नागरिकांना केले परत; १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळी सणाचे औचित्य साधत पुणे शहर पोलिसांनी नागरिकांना अनोखी भेट दिली आहे. परिमंडळ क्रमांक ४ अंतर्गत हरवलेले तसेच चोरीस गेलेले तब्बल ४० मोबाईल फोन शोधून ते मूळ मालकांना परत करण्यात पुणे पोलिसांना यश आले आहे. हस्तगत करण्यात आलेल्या या मोबाईल फोनची एकूण किंमत सुमारे १० लाख रुपये असून, दिवाळीच्या सणात हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे आणि पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी परिमंडळ ४ हद्दीतील हरवलेले व चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधण्यासाठी केंद्र शासनाच्या CEIR (Central Equipment Identity Register) प्रणालीचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार पोलीस उपायुक्त चिलूमुला रजनीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ ४ मधील सहा पोलीस ठाण्यांच्या अधिकारी व अंमलदारांनी विशेष मोहीम राबवली. CEIR प्रणालीच्या माध्यमातून हरवलेल्या व चोरीस गेलेल्या मोबाईल फोनचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. या तपासादरम्यान संबंधित मोबाईल फोन महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह महाराष्ट्राबाहेरील राज्यांमध्ये वापरले जात असल्याची माहिती समोर आली.

त्यानंतर मोबाईल वापरणाऱ्यांशी तसेच संबंधित राज्यांतील पोलीस ठाण्यांशी संपर्क साधून तांत्रिक तपासाच्या आधारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२६ या कालावधीत एकूण ४० मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. या सर्व मोबाईलची अंदाजित किंमत १० लाख रुपये आहे. गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी पोलीस उपायुक्त चिलूमुला रजनीकांत आणि येरवडा विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संबंधित नागरिकांना त्यांचे हरवलेले मोबाईल फोन परत करण्यात आले. दिवाळीच्या सणात अचानक हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी पुणे शहर पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त चिलूमुला रजनीकांत, सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर आणि खडकी विभागाचे सहायक पोलीस आयुक्त ब्रह्मदेव गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



'घरमालकाचा हक्क संपत नाही'

सुप्रीम कोर्टाचे भाडेकरूला घर रिकामे करण्याचे आदेश : अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द

पुणे (दै. आरंभ पर्व)

भाडेकरूविरोधात दशकानुदशके चाललेल्या कायदेशीर लढाईमुळे घरमालकाची स्वतःच्या जागेची रास्त व वैयक्तिक गरज संपुष्टात येत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. उत्तर प्रदेशातील पीलीभीत येथील तब्बल ४० वर्षे जुन्या घरमालक-भाडेकरू वादावर पडदा टाकताना सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबादल ठरवला असून, भाडेकरूला तातडीने जागा रिकामी करण्याचा आदेश दिला आहे. घरमालकाने जुलै १९८४ मध्ये या मालमत्तेची मालकी मिळवली होती. त्यानंतर उत्तर प्रदेश नागरी भवन कायदा १९७२ अंतर्गत भाडेकरूला नोटीस पाठवून तीन वर्षांच्या आत जागा रिकामी करण्याची मागणी केली होती. १९९८ मध्ये सक्षम प्राधिकरणासमोर आश्वासन देऊनही भाडेकरूने जागा रिकामी केली नाही. त्यानंतर घरमालकाने २०१० मध्ये भाडेकरूविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. मुलाला मेडिकल प्रॅक्टिक्स करायची आहे. या जागेची अत्यंत गरज असल्याचे त्यांनी न्यायालयात मांडले. डिसेंबर २०१२ मध्ये सक्षम प्राधिकरणाने घरमालकाची गरज रास्त आणि योग्य मानत भाडेकरूला जागा रिकामी करण्याचे आदेश दिले. अपीलीय प्राधिकरणानेही या निर्णयावर शिक्कामोर्तब केले होते.

या निर्णयाविरोधात भाडेकरूने अलाहाबाद उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने मार्च २०२५ मध्ये कनिष्ठ न्यायालयांचे सर्व आदेश रद्द केले. या निर्णयाला आव्हान देत अखेर घरमालकाने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते.

न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा आणि न्यायमूर्ती नोंगमेईकापम कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने या प्रकरणी सत्र न्यायालयाने यापूर्वी दिलेला घर रिकामे करण्याचा आदेश पूर्णपणे बहाल केला. यावेळी सुनावणीदरम्यान खंडपीठाने स्पष्ट केले की, "काळानुसार सुरुवातीचे तांत्रिक अडथळे दूर होतात. केवळ न्यायालयात दीर्घकाळ खटला प्रलंबित राहिला किंवा लांबला म्हणून घरमालकाची प्रामाणिक आणि मूलभूत गरज संपत नाही."





धनत्रयोदशी

समृद्धीचा उत्सव की आर्थिक विवेकाचा संकल्प?

धनत्रयोदशी हा केवळ सोने, चांदी, दागिने आणि नव्या वस्तूंच्या खरेदीचा सण नाही, तर भारतीय संस्कृतीत धन, आरोग्य, समृद्धी आणि श्रमप्रतिष्ठेला महत्त्व देणारा मंगल दिवस आहे. दिवाळीच्या प्रारंभी येणारा हा सण प्रत्येकाच्या मनात आनंद, उत्साह आणि नव्या आशा निर्माण करतो. मात्र, बदलत्या काळात धनत्रयोदशी साजरी करताना तिच्या मूळ उद्देशाचा विचार करणेही तितकेच आवश्यक आहे.

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

धनत्रयोदशी म्हटले की बाजारपेठांमध्ये सोन्या-चांदीच्या दुकानांपासून इलेक्ट्रॉनिक्स, वाहन आणि गृहपयोगी वस्तूंच्या दुकानांपर्यंत सर्वत्र खरेदीचा उत्साह दिसून येतो. जाहिरातींचा भडिमार, आकर्षक सवलती आणि विविध ऑफर्समुळे ग्राहकांना खरेदीकडे आकर्षित केले जाते. शुभमुहूर्ताच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. व्यापाऱ्यांसाठी हा महत्त्वाचा व्यवसायाचा काळ असतो, तर ग्राहकांसाठी आनंदाचा क्षण असतो. परंतु या उत्साहात आर्थिक परिस्थितीचा विसर पडता कामा नये.

आज समाजातील एक मोठा वर्ग महागाई, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि वाढत्या कौटुंबिक खर्चाशी झुंज देत आहे. एका बाजूला सोन्याचे भाव गगनाला भिडले आहेत, तर दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य माणसाला दैनंदिन गरजा भागवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत केवळ परंपरा म्हणून किंवा सामाजिक प्रतिष्ठेसाठी कर्ज काढून खरेदी करणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

धनत्रयोदशीच्या दिवशी भगवान धन्वंतरी यांची पूजा करण्याची परंपरा आहे. समुद्रमंथनातून धन्वंतरी अमृतकलश घेऊन प्रकट झाल्याची पौराणिक मान्यता आहे. त्यामुळे या दिवसाला आरोग्य आणि दीर्घायुष्याचेही विशेष महत्त्व आहे. मात्र, आज आपण संपत्तीच्या मागे धावताना आरोग्याकडे किती लक्ष देतो? पैसा कमावण्यासाठी अहोरात्र मेहनत करणारा माणूस स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ काढतो का? मानसिक शांतता, कौटुंबिक समाधान आणि निरोगी जीवन यांचे मोल आपण पैशाच्या तुलनेत कमी तर मानत नाही ना?

खरे तर धन म्हणजे केवळ तिजोरीतील सोने किंवा बँकेतील शिल्लक नव्हे. ज्ञान हे धन आहे, आरोग्य हे धन आहे, चांगले संस्कार हे धन आहे, कष्ट करण्याची तयारी हे धन आहे आणि माणुसकी ही सर्वांत मोठी संपत्ती आहे. शेतकऱ्याच्या घामातून निर्माण होणारे अन्न, कामगारांच्या श्रमातून उभे राहणारे उद्योग, शिक्षकांनी दिलेले ज्ञान आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान हेच समाजाच्या समृद्धीचे खरे आधारस्तंभ आहेत.

धनत्रयोदशीच्या निमित्ताने समाजातील आर्थिक विषमतेचाही विचार व्हायला हवा. एका बाजूला लाखो रुपयांच्या खरेदीची चर्चा सुरू असताना दुसऱ्या बाजूला अनेक कुटुंबांना सण साजरा करण्यासाठी आवश्यक वस्तूही परवडत नाहीत. अशा वेळी गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, एखाद्या गरीब कुटुंबाला मदतीचा हात देणे, कामगारांना योग्य मोबदला देणे आणि स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी करून त्यांच्या व्यवसायाला हातभार लावणे, हीदेखील समृद्धीचीच खरी पूजा ठरू शकते.

धनत्रयोदशी आपल्याला संपत्ती मिळवण्याची प्रेरणा देते; परंतु त्याचबरोबर संपत्तीचा योग्य वापर करण्याची शिकवणही देते. पैसा कमवावा, पण तो प्रामाणिक मार्गाने. खर्च करावा, पण आर्थिक नियोजन करून. स्वतःची प्रगती साधावी, पण समाजातील दुर्बल घटकांना विसरू नये.

आजच्या धनत्रयोदशीला केवळ सोने-चांदी खरेदी करण्यापुरते मर्यादित न ठेवता आरोग्याची काळजी घेण्याचा, आर्थिक शिस्त पाळण्याचा, कष्टाचा सन्मान करण्याचा आणि माणुसकी जपण्याचा संकल्प करूया. कारण खऱ्या अर्थाने श्रीमंत तोच, ज्याच्याकडे पैसा असण्याबरोबरच समाधान, आरोग्य, संस्कार आणि दुसऱ्याच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याची क्षमता आहे. शेवटी एकच विचार महत्त्वाचा आहे, तिजोरीत किती धन आहे यापेक्षा आपल्या मनात किती समाधान आणि आपल्या कृतीत किती माणुसकी आहे, यावरच खऱ्या समृद्धीचे मोजमाप ठरते!

६७ व्या वार्षिक अहवालाचे दिमाखात प्रकाशन

दिव्यांग विद्यार्थी व तृतीयपंथी सुरक्षा रक्षकांना दिवाळी फराळ वाटप



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महानगरपालिका कर्मचारी (पीएमसी एम्प्लॉईज) युनियनच्या ६७ व्या वार्षिक अहवालाचा प्रकाशन सोहळा तसेच पुणे महानगरपालिका शाळांमधील विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांना आणि तृतीयपंथी सुरक्षा रक्षकांना दिवाळीनिमित्त फराळ वाटपाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक बांधिलकी आणि कर्मचारी हिताचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला महापालिकेचे अधिकारी, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला पुण्याचे उपमहापौर परशुरामजी वाडेकर, माजी नगरसेवक मुकारी अण्णा अलगुडे, नगरसेवक सुहास टिंगरे, रवी टिंगरे, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, सहमहापालिका आयुक्त उल्का कळसकर, उपायुक्त माधव जगताप, उपायुक्त रवी पवार, मुख्य विधी अधिकारी निशा चव्हाण, नगरसचिव योगिता भोसले, गोरक्षक मिलिंद एकबोटे, निवृत्ती संघाचे अध्यक्ष जयवंत पवार, कार्यालय सचिव संजीव मोरे, वर्षा काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमहापौर परशुरामजी वाडेकर यांनी संघटनेच्या ६७ व्या वार्षिक अहवालाच्या प्रकाशनाबद्दल पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा देताना वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करून पाणी बचतीचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी संघटनेच्या ६७ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक केले. कर्मचारी हितासाठी तसेच संघटनेच्या सकारात्मक कार्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपायुक्त माधव जगताप यांनी आपल्या रोखठोक शैलीत पुणे महानगरपालिकेचे कामकाज आणि त्यामध्ये कर्मचारी संघटनेचे योगदान याविषयी स्पष्ट भूमिका मांडली. तसेच उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

संघटनेचे अध्यक्ष बजरंग पोखरकर यांनी वर्षभरात संघटनेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामांचा सविस्तर आढावा मांडला. महापालिका कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाजात भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी आणि कर्मचारी हिताशी संबंधित प्रश्न त्यांनी उपस्थित केले. या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाला उपस्थित राहून कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढवल्याबद्दल सर्व मान्यवरांचे त्यांनी आभार मानले. तसेच महापालिकेतील सर्व सेवक बांधवांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. वार्षिक अहवाल प्रकाशन सोहळ्याला सामाजिक उपक्रमाची जोड देत महापालिका शाळांमधील विशेष दिव्यांग विद्यार्थी आणि तृतीयपंथी सुरक्षा रक्षकांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सर्वसमावेशकता, सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला.

पदाधिकाऱ्यांच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वी

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन आणि नेटके सूत्रसंचालन श्रीभाई चव्हाण, विशाल ठोंबरे, गिरीश बहिरट, राजू ढाकणे, पूजा देशमुख, छाया सूर्यवंशी, दीपावली गायकवाड, दीपक भिसे, राजू जाधव, शलाका कांबळे, कुंभार मॅडम, रघुनंदन भुजबळ, गुजराथी, भाऊसाहेब पाटील, संतोष स्वामी, दीपक घोडके, सुभाष थोरात, सुनील मध्ये, प्रिया होडे आणि सचिन नलावडे या पदाधिकाऱ्यांनी केले. ६७ वर्षांची परंपरा जपत कर्मचारी हित, संघटनात्मक कार्य आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

थोडक्यात पण महत्वाचे



बनावट शिक्के, अवैध स्टॅम्प विकल्याप्रकरणी सागर काळेला नोटीस

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील काळेवाडी चौफुला या ठिकाणी असलेल्या ज्ञानेश्वरी ऑनलाईन केंद्र याचा चालक सागर बाळासो काळे याला दौंड पोलिसांनी रंगेहात पकडले त्याच्याकडे दौंड तहसीलदार यांचा बनावट शिका बनाव स्टॅम्प तसेच अनेक साधनसामुग्री जप्त करण्यात आली याबाबत मंडल अधिकारी वर्षाराणी दळवी यांनी दौंड पोलिसात गुन्हा दाखल केला आहे, या ऑनलाइन केंद्रामध्ये अनेक प्रकारे बोगस दाखले, तसेच बोगस प्रकरणे करून शेतकऱ्याची मोठी फसवणूक झाल्याची चर्चा सर्वत्र होत आहे, याबाबत या प्रकरणाचे तपासी अधिकारी अमोल गवळी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की BNNS 35(3) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे, या प्रकरणाच्या तपास कामी नोटीस देऊन बोलवण्यात आले आहे . योग्य प्रकारे तपास झाल्यास अनेक प्रकरणे बाहेर येण्याची शक्यता ना करता येत नाही, दिवसा ढवळ्या महसूलची तसेच शासनाचे गोरगरीब जनतेची फसवणूक अनेक वर्षापासून होत होती परंतु याला महसूल विभागाचा चुपा पाठिंबा तर नाही ना अशी शंका येत आहे.

यशवंतच्या ऊस उत्पादक सभासदांना बिल मिळण्याचा मार्ग मोकळा!

संमतीपत्रासाठी सक्ती न करण्याचे प्रादेशिक उपसंचालकांचे आदेश; शेतकरी सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण

लोणी काळभोर (चंद्रकांत दुंडे) (दै. आरंभ पर्व)

थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखाना बंद पडल्यानंतर शेतकरी सभासदांचे ऊसबिलाचे पैसे दीर्घकाळ थकीत राहिले होते. या थकीत रकमेवर मिळणाऱ्या व्याजाचा प्रश्नही प्रलंबित होता. मात्र, आता या प्रकरणात शेतकरी सभासदांना दिलासा मिळण्याची चिन्हे निर्माण झाली असून, थकीत ऊसबिलांचे पेमेंट व्याजासह मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कारखाना बंद पडल्यानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाचे पेमेंट वेळेत मिळाले नव्हते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी सोसायट्या आणि बँकांकडून घेतलेले पीककर्ज स्वतःच्या उत्पन्नातून व्याजासह फेडले. थकीत ऊसबिलांची रक्कम व्याजासह मिळेल, या आशेवर शेतकरी सभासद अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत होते.

मात्र, कारखान्याकडून एफआरपीचे पेमेंट आणि थकीत ऊसबिलांचे धनादेश वाटप करताना व्याज न घेण्याच्या संमतीपत्रावर सभासदांच्या जबरदस्तीने सह्या घेतल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला होता. याप्रकरणी कारखान्याचे सभासद भरत लक्ष्मण कुंजीर यांच्यासह अन्य तीन सभासदांनी मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) तक्रार अर्ज दाखल केला होता.

सन २००९-१० या गळीत हंगामातील दुसऱ्या हप्त्याचे उर्वरित पेमेंट तसेच सन २०१०-११ हंगामातील एफआरपीपैकी थकीत ऊसबिलांचे धनादेश वितरित करताना व्याज न घेण्याच्या संमतीपत्रावर कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि संचालकांकडून सक्तीने सह्या घेतल्या जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रादेशिक उपसंचालक प्रशांत सूर्यवंशी यांनी कारखान्याच्या कार्यकारी संचालकांना पत्र पाठवून संमतीपत्रावर सह्या करण्यासाठी कोणत्याही सभासदावर सक्ती करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

तसेच एफआरपी पेमेंट आणि थकीत ऊसबिलांच्या संदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदी, शासन निर्णय, परिपत्रके तसेच साखर आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार योग्य ती कार्यवाही करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या तक्रारी उद्भवणार नाहीत, याची दक्षता घेण्यासही सांगण्यात आले आहे.

प्रादेशिक उपसंचालकांच्या या भूमिकेमुळे यशवंत कारखान्याच्या शेतकरी सभासदांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून थकीत ऊसबिल आणि त्यावरील व्याजाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांसाठी उभारलेल्या लढ्याला प्रशासकीय स्तरावर मिळालेला हा महत्त्वाचा प्रतिसाद मानला जात असून, आता थकीत ऊसबिलांचे व्याजासह प्रत्यक्ष वितरण कधी होणार, याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

७५ टक्के जेन-झी आणि मिलेनियल्सचा बहुपिढींसोबत प्रवास करण्याकडे कल

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतातील कौटुंबिक सुट्टीला एक नवीन अर्थ प्राप्त होत आहे, कारण प्रवासी केवळ नवीन ठिकाणे शोधण्यापलीकडे जाऊन विविध पिढ्यांमधील प्रियजनांसोबत दर्जेदार वेळ घालवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. एअरबीएनबीच्या आंतरपिढी प्रवासावरील नवीन सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की, चारपैकी तीन (७५ टक्के) जेन-झी आणि मिलेनियल प्रतिसादक वेगवेगळ्या पिढ्यांमधील कुटुंबातील सदस्यांसोबत प्रवास करण्याची अधिक शक्यता आहे. हे एकत्र येणे, सामायिक अनुभव आणि अर्थपूर्ण नातेसंबंधांवर केंद्रित असलेल्या सुट्ट्यांमधील त्यांची वाढती आवड दर्शवते. हा बदल एअरबीएनबीवरील मोठ्या ग्रुपच्या निवासाच्या मागणीमध्ये दिसून येत आहे. एअरबीएनबीच्या अंतर्गत डेटानुसार किमान एक मूल किंवा बाळ असलेल्या पाच किंवा अधिक पाहुण्यांच्या गटांच्या निवासासाठीच्या देशांतर्गत शोधांमध्ये मागील काही वर्षांत ५५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. एकत्र कौटुंबिक सहलींपासून ते प्रियजनांना एका छताखाली एकत्र आणणाऱ्या सुट्ट्यांपर्यंत हे निष्कर्ष प्रवासाच्या आवडीनिवडी ठरवण्यात नातेसंबंध आणि क्वालिटी टाइमचे महत्त्व अधोरेखित करतात. एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत सिंग बजाज म्हणाले, "कौटुंबिक सुट्ट्या या भारतीयांच्या प्रवासाचा नेहमीच एक महत्त्वाचा भाग राहिल्या आहेत.

सहकार महर्षी काकासाहेब थोरात पतसंस्थेच्या

नेतृत्वाची धुरा प्रदीप धायगुडे यांच्याकडे



व्हाईस चेअरमनपदी संजीवनी गडधे यांची बिनविरोध निवड

दौंड (दै. आरंभ पर्व)

सहकार क्षेत्रात विश्वासार्हता आणि पारदर्शकतेची परंपरा जपणाऱ्या सहकार महर्षी काकासाहेब थोरात पतसंस्थेच्या नेतृत्वात नवे पर्व सुरू झाले आहे. संस्थेच्या चेअरमनपदी प्रदीप धायगुडे, तर व्हाईस चेअरमनपदी संजीवनी गडधे यांची संचालक मंडळाच्या एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडीमुळे संस्थेच्या आगामी वाटचालीला नवे नेतृत्व लाभले असून सभासद आणि सहकार क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. सहकार महर्षी स्वर्गीय काकासाहेब थोरात यांच्या नावाने सुरू झालेल्या या पतसंस्थेची स्थापना २००४ साली संस्थेचे मार्गदर्शक तथा सल्लागार आनंद थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अल्पावधीतच संस्थेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. संस्थेच्या स्थापनेपासून सभासदांचा विश्वास संपादन करत आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वासार्हता जपण्याचा प्रयत्न संस्थेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

संस्थेचे तत्कालीन चेअरमन प्रशांत सिताराम गडधे आणि व्हाईस चेअरमन उषा दादा सरगर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची प्रक्रिया पार पडली. यावेळी संचालक मंडळाच्या बैठकीत चेअरमनपदासाठी प्रदीप धायगुडे, तर व्हाईस चेअरमनपदासाठी संजीवनी गडधे यांच्या नावावर एकमत झाले. त्यानुसार दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नम्रता गुरव यांनी कामकाज पाहिले. निवडीनंतर नवनिर्वाचित चेअरमन प्रदीप धायगुडे यांनी संस्थेच्या आगामी वाटचालीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली ते म्हणाले की, सहकार महर्षी स्वर्गीय काकासाहेब थोरात यांच्या नावाने सुरू असलेल्या या संस्थेचा सहकार क्षेत्रात आदराने उल्लेख केला जातो. नुकतीच आपण स्वर्गीय काकासाहेब थोरात यांची जन्मशताब्दी साजरी केली आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा जपत संस्थेच्या नावाला साजेसा कारभार करण्याचा आमचा प्रयत्न राहील. शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देत दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल तसेच संस्थेचे मार्गदर्शक आनंद थोरात आणि अभिषेक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची प्रगती साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या निवडीप्रसंगी संस्थेचे संचालक प्रशांत सिताराम गडधे, उषा दादा सरगर, विठ्ठल बाबुराव मिसाळ, सखाराम हिरामण कोळपे, त्र्यंबक नानासाहेब सोडनवर, गणेश बाबुराव वत्रे, ज्ञानदेव लक्ष्मण काळे, दिनेश सुरेश गडधे, अनिल सोपाना बारवकर आणि कैलास तुकाराम शेंडगे उपस्थित होते. तसेच संस्थेचे सचिव दिनकर धायगुडे, सहसचिव संतोष लोणकर, महेश गडधे, तुषार चोरमले, शुभम मारकड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दिनेश गडधे यांनी नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बिनविरोध निवडीमुळे संस्थेच्या नेतृत्वात नवी दिशा मिळाली असून, सभासदांचा विश्वास अधिक दृढ करत सहकाराच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करण्याचे आव्हान आता नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांसमोर असणार आहे.

- गेल्या ११ वर्षांपासून सेवाकार्याची परंपरा अखंड
- सफाई कामगार, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व निराधारांना मदतीचा हात

मंचर येथे २८८ जणांना दिवाळी किराणा किटचे वाटप



आंबेगाव (दै. आरंभ पर्व)

समाजातील कष्टकरी, गरजू आणि निराधार घटकांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक बांधिलकीतून जनसेवक संजय जिजाबा थोरात यांच्या माध्यमातून मंचर शहरातील सफाई कामगार, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व निराधार व्यक्तींना दिवाळीनिमित्त किराणा किटचे वाटप करण्यात आले. मंचर मार्केट यार्ड येथील सभागृहात दि. ४ रोजी झालेल्या या कार्यक्रमात एकूण २८८ लाभार्थ्यांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.

गेल्या अकरा वर्षांपासून संजय थोरात यांनी हा सामाजिक उपक्रम सातत्याने सुरू ठेवला असून, यंदा या उपक्रमाचे बारावे वर्ष आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून कोणताही मोठा सोहळा आयोजित न करता साध्या पद्धतीने हा कार्यक्रम घेण्यात आला. समाजातील कष्टकरी आणि गरजू घटकांची दिवाळी गोड व्हावी, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी ह.भ.प. गणेश महाराज घोडेकर म्हणाले की, संजय थोरात यांनी कधीही राजकारणाचा विचार न करता समाजातील गरजू व्यक्तींचे दुःख कमी करण्यासाठी सातत्याने काम केले आहे. त्यांचे कार्यालय आजही सर्वसामान्यांच्या सेवेसाठी खुले असते. समाजातील इतरांनीही त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सामाजिक कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या संध्या दीदी यांनीही संजय थोरात यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. गरीब, गरजू व निराधार व्यक्तींची दिवाळी आनंदात जावी, यासाठी ते दरवर्षी राबवत असलेला उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संजय थोरात म्हणाले की, समाजाचे आरोग्य चांगले राहावे यासाठी सफाई कामगार, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका अहोरात्र मेहनत घेत असतात. त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा आणि त्यांच्या कुटुंबीयांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या भावनेतून गेल्या अकरा वर्षांपासून हा उपक्रम राबवत आहोत. या सर्व लाडक्या बहिणींच्या आणि गरजू बांधवांच्या पाठीशी हा भाऊ सदैव खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही देत त्यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या संध्या दीदी, ह.भ.प. गणेश महाराज घोडेकर, ज्येष्ठ नेते भानुदास नाना काळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब खानदेशे, सामाजिक कार्यकर्ते राजू बेंडे पाटील, विनायक धुमाळ, उत्तम राक्षे, जितेंद्र त्रिवेदी, दीपक वखरे, गणेश थोरात, कालिदास गांजाळे, भरत काळे, वैभव काळे, संपत थोरात, उमेश कांदारे, सुनित थोरात, हर्षल खानदेशे, प्रवीण फुटाणे, संतोष थोरात आदी उपस्थित होते.

महिला आघाडीच्या प्रमिला निऱ्हाळे, रुपाली घोलप, स्नेहल चासकर, अर्चना बुट्टे, पूजा भोर, सुषमा थोरात यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ थोरात यांनी केले. समाजातील शेवटच्या घटकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, हीच खरी समाजसेवा असून दुसऱ्याची दिवाळी गोड करण्यातच माणुसकीचा खरा प्रकाश दडलेला आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



केडगाव–चौफुला रोडवर अज्ञात वाहनाच्या धडकेत मादी तरसाचा मृत्यू

- वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील केडगाव – चौफुला मार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत सुमारे दहा वर्षे वयाच्या मादी तरसाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने या वन्यप्राण्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरातील वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सकाळच्या सुमारास रस्त्यालगत मादी तरस मृतावस्थेत आढळून आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचारी सोनाली चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मृत तरसाचा ताबा घेऊन पुढील कार्यवाही सुरू केली. त्यानंतर मृत प्राण्याला पुढील तपासणीसाठी केडगाव येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, मृत मादी तरसाच्या परिसरात नर तरस किंवा तिचे बछडे असण्याची शक्यता स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, या शक्यतेला वनविभागाकडून अधिकृत दुजोरा मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित परिसरात वनविभागाने पाहणी करून वन्यप्राण्यांच्या अस्तित्वाबाबत माहिती घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. केडगाव चौफुला वाहनांची या मार्गावर ये जा सुरू असते या मार्गाच्या परिसरात वन्य प्राण्यांचा या परिसरात वावर लक्षात घेता वाहन चालकाने वेगावर नियंत्रण ठेवून सावधगिरीने वाहन चालवणे गरजेचे आहे. केवळ वाहन चालकाच्या निष्काळाचीपणामुळे वन्यजीवांचे जीव धोक्यात येऊ नयेत, या मार्गावर आवश्यक त्या उपाययोजना करावेत, अशी मागणी वन्यप्राणी कडून होत आहे.

एचपी इंडियाचे दोन नवीन एआय लॅपटॉप बाजारात

- विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भेट
- ओम्निबुक ५ आणि प्रोबुक ४ जी२आयएस सादर

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्जनशील गरजा तसेच भारतातील वाढत्या व्यवसायांच्या बदलत्या तांत्रिक अपेक्षा लक्षात घेऊन एचपी इंडियाने दोन नवीन लॅपटॉप बाजारात सादर केले आहेत. एचपी ओम्निबुक ५ आणि एचपी प्रोबुक ४ जी२आयएस या नव्या उपकरणांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित कार्यक्षमता, आधुनिक डिझाइन, उत्तम बॅटरी क्षमता आणि प्रगत सुरक्षा सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण, ऑनलाइन वर्ग, सर्जनशील प्रकल्प आणि मनोरंजनासाठी उपयुक्त ठरणारा ओम्निबुक ५, तर लघु व मध्यम उद्योग, उद्योजक आणि मोबाइल व्यावसायिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रोबुक ४ जी२आयएस विकसित करण्यात आला आहे.एचपी इंडियाच्या पर्सनल सिस्टीम्स विभागाचे वरिष्ठ संचालक विनीत गेहानी म्हणाले की, भारतातील विद्यार्थी आणि व्यवसाय अधिकाधिक डिजिटल तंत्रज्ञानाशी जोडले जात आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाकडून त्यांच्या अपेक्षाही बदलत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण आणि सर्जनशीलतेला गती देणारी उपकरणे, तर व्यवसायांना उत्पादकता वाढविण्यासोबतच सुरक्षित आणि विश्वासार्ह संगणकीय प्रणालींची आवश्यकता आहे. हीच गरज लक्षात घेऊन दोन्ही नवीन लॅपटॉप विकसित करण्यात आले आहेत.



डोळ्यांना दुखापत झालेल्या चिमुकल्यांवर मोफत उपचार

पुणे (आरंभ पर्व) : एएसजी हॉस्पिटल लिमिटेडने सणासुदीच्या कालावधीत मुलांच्या डोळ्यांच्या सुरक्षेसाठी 'सुरक्षित डोळे, सुरक्षित दिवाळी' ही एक विशेष मोहीम सुरू केली आहे. कंपनीच्या या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत, फटाक्यांमुळे डोळ्यांना दुखापत झालेल्या १५ वर्षांखालील मुलांवर एएसजी आय हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार केले जातील. हा उपक्रम ४ नोव्हेंबर २०२६ ते १४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड सहित भारतातील ९५ हून अधिक शहरांमधील २०० हून अधिक एएसजी आय हॉस्पिटल केंद्रांवर राबवला जाणार आहे. पुण्यातील एएसजी हॉस्पिटलचे डॉ. हेमंत कांबळे, डॉ. आकाश यादव, डॉ. अनुप सदाफळे, डॉ. पियुष जैन, डॉ. निकिता सोनावणे तसेच पिंपरी चिंचवड एएसजी हॉस्पिटलचे डॉ. भूपेश जैन, डॉ. कौस्तुभ देशमुख, डॉ. कुलहर्ष जैस्वाल, डॉ. महिमा बनकर हे यंदाच्या दिवाळीनिमित्तच्या या उपक्रमात सहभागी असणार आहेत.

चेहऱ्याच्या गंभीर फ्रॅक्चरवर तीन यशस्वी शस्त्रक्रिया

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये रुग्णांना नवा दिलासा!

- जबडा, गाल आणि चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर आधुनिक ORIF तंत्राद्वारे उपचार
- आयुष्मान भारत योजनेतून तिन्ही रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया



अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)

चेहऱ्याला झालेली गंभीर दुखापत ही केवळ बाह्य स्वरूपापुरती मर्यादित नसते. अशा दुखापतींमुळे बोलणे, अन्न चावणे, जबड्याची हालचाल आणि चेहऱ्याच्या नैसर्गिक रचनेवरही परिणाम होऊ शकतो. अशाच गुंतागुंतीच्या दुखापतींवर मात करण्यासाठी डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील प्लास्टिक सर्जरी विभागाने तीन रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. विशेष म्हणजे, या तिन्ही रुग्णांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारांचा लाभ मिळाला. या तीन रुग्णांच्या दुखापतींचे स्वरूप वेगवेगळे होते. पहिल्या रुग्णाच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूच्या वरच्या जबड्याचे (Maxilla), खालच्या जबड्याचे (Mandible) आणि गालाच्या हाडाचे (Zygomatic Bone) फ्रॅक्चर झाले होते. दुसऱ्या रुग्णाच्या खालच्या जबड्याचे, तर तिसऱ्या रुग्णाच्या गालाच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले होते. प्रत्येक रुग्णाच्या दुखापतीचे स्वरूप, हाडांची स्थिती आणि संभाव्य गुंतागुंत लक्षात घेऊन डॉक्टरांनी स्वतंत्र शस्त्रक्रिया नियोजन केले.

या शस्त्रक्रियांसाठी ORIF (Open Reduction and Internal Fixation) या आधुनिक पद्धतीचा वापर करण्यात आला. या तंत्रामध्ये फ्रॅक्चर झालेली हाडे योग्य स्थितीत आणून विशेष वैद्यकीय प्लेट्स आणि स्क्रूच्या साहाय्याने स्थिर केली जातात. यामुळे हाडांची योग्य जुळणी होण्यास मदत होते. चेहऱ्याची नैसर्गिक रचना, दातांची जुळणी आणि जबड्याची कार्यक्षमता पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने ही उपचारपद्धती महत्त्वाची ठरते.

प्लास्टिक सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. अजित काळे, तसेच डॉ. धीरज जुमडे आणि डॉ. अश्विन वानखेडे यांनी या शस्त्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. चेहऱ्याच्या विविध हाडांना झालेल्या दुखापतींवर अचूक उपचार करताना वैद्यकीय कौशल्यासोबतच सूक्ष्म शस्त्रक्रिया नियोजनाची आवश्यकता असते. डॉक्टरांच्या समन्वयातून तिन्ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने आणि वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात विशेष वैद्यकीय सेवांच्या बळकटीकरणावर भर दिला जात आहे. चेहऱ्याच्या गंभीर दुखापतींवर अत्याधुनिक शस्त्रक्रिया सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे ही अहिल्यानगर आणि परिसरातील रुग्णांसाठी दिलासादायक बाब आहे. प्लास्टिक सर्जरी विभागाच्या या यशस्वी शस्त्रक्रियांमुळे गुंतागुंतीच्या चेहऱ्याच्या फ्रॅक्चरवरील तज्ज्ञ उपचार रुग्णालयात उपलब्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

महागड्या उपचारांचा आर्थिक भार टळला

चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर शस्त्रक्रिया करताना विशेष उपकरणे, वैद्यकीय साहित्य आणि तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असते. मात्र, या तिन्ही रुग्णांवर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे रुग्णांना आवश्यक आधुनिक उपचार मिळण्याबरोबरच उपचारांच्या खर्चातूनही दिलासा मिळाला.



ह.भ.प. कबीर महाराज अत्तार यांचे विशेष कीर्तन

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

उरुळी कांचन येथील कै. कांतीलाल चंद्रकांत काळे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध राष्ट्रीय शिवशंभू व्याख्याते ह.भ.प. कबीर महाराज अत्तार यांच्या विशेष कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाला भाविक, ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी ह.भ.प. कबीर महाराज अत्तार यांनी 'बाप' या विषयावर प्रभावी निरूपण केले. वडिलांचे कुटुंबातील स्थान, त्यांनी मुलांसाठी केलेला त्याग, कुटुंबाच्या उन्नतीसाठी घेतलेले कष्ट, दिलेले संस्कार आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीने कशा पद्धतीने जपावा, याविषयी त्यांनी मार्मिक विचार मांडले. त्यांच्या ओघवत्या वाणीतून उपस्थितांना भावनिक तसेच वैचारिक संदेश मिळाला. कै. कांतीलाल काळे यांचे व्यक्तिमत्त्व माणसे जोडणारे, सर्वांना सोबत घेऊन चालणारे आणि उत्कृष्ट संघटन कौशल्य असणारे होते. समाजातील विविध स्तरांतील लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणे, प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि माणुसकीची नाती जपणे, ही त्यांची खास ओळख होती. त्यांनी आयुष्यभर जपलेली सामाजिक बांधिलकी आणि माणसांची संपत्ती हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख होती. वडिलांनी निर्माण केलेला हा सामाजिक वसा आणि वारसा त्यांचे चिरंजीव शुभम काळे पुढे चालवत आहेत.

चारा छावण्या आणि मोफत पाण्याची व्यवस्था होणार

- पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर मुक्या जनावरांना दिलासा
- चारा, पाणी आणि उपचारांसाठी महापालिका प्रशासनाकडून व्यवस्था करण्याची मागणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महानगरपालिका हद्दीतील बेवारस आणि भटक्या गोवंशीय जनावरांच्या अन्न-पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तात्पुरत्या चारा छावण्या सुरू करणे, मोफत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे आणि त्यांच्या देखभालीसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या प्रस्तावाला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली आहे. नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य सुहास विजय टिंगरे यांनी मांडलेल्या या संवेदनशील मागणीमुळे शहरातील भटक्या जनावरांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

पुणे शहरात ३२ गावांचा समावेश झाल्यानंतर बेवारस आणि भटक्या जनावरांची संख्या वाढली आहे. या जनावरांच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी सुसज्ज गोशाळा उभारण्याचा प्रस्ताव सुहास टिंगरे यांनी यापूर्वी मांडला होता. या प्रस्तावाला मुख्य सभेनेही मान्यता दिली आहे. मात्र, गोशाळेची प्रत्यक्ष उभारणी होईपर्यंत या जनावरांच्या अन्न-पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. विशेषतः राज्यात आणि पुणे शहरात संभाव्य पाणीटंचाई तसेच दिवसाआड पाणीपुरवठ्याची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, मुक्या जनावरांची अन्न आणि पाण्याअभावी होणारी गैरसोय टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली होती. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गोशाळा संस्था, गोसेवा संस्था, गोरक्षक आणि पशुप्रेमी स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्याची सूचना करण्यात आली आहे. त्याचबरोबर जनावरांच्या संरक्षणासाठी आवश्यक जागा, मनुष्यबळ आणि आर्थिक तरतूद महापालिका प्रशासनाने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. स्थायी समितीच्या मान्यतेमुळे या प्रस्तावाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला असून, भटक्या जनावरांना चारा, पाणी आणि आवश्यक उपचारांची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

सुहास टिंगरे यांच्या या पुढाकाराचे शहरातील पशुप्रेमी आणि गोसेवा संस्थांकडून स्वागत होत आहे. मुक्या जनावरांच्या वेदना समजून त्यांच्या अन्न-पाण्याची व्यवस्था करण्यासाठी घेतलेला हा निर्णय केवळ प्रशासकीय उपाय नसून सामाजिक संवेदनशीलतेचेही दर्शन घडवणारा ठरणार आहे.

सुहास टिंगरे यांच्या मागणीला स्थायी समितीची मान्यता

टिंगरे यांच्या प्रमुख मागण्यांना मान्यता

सुहास टिंगरे यांनी उपसूचनेद्वारे काही महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. त्यामध्ये शहरातील ज्या भागांत भटक्या जनावरांची संख्या अधिक आहे, त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात चारा छावण्या सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शहरातील विविध चौक, मोकळ्या जागा आणि जनावरांचा वावर असलेल्या सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची भांडी अथवा पाण्याच्या टाक्या उपलब्ध करून देण्याची सूचना करण्यात आली आहे. शहरात ज्या दिवसापासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू होईल, त्याच दिवसापासून चारा आणि पाण्याच्या सुविधांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यावी, अशीही आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

लक्ष्मीपूजनाच्या परंपरेत झाडूला लक्ष्मीचे स्थान

- मात्र ती बनविणाऱ्या कष्टकऱ्यांच्या श्रमांना बाजारात कवडीमोल भाव
- ग्रामीण कारागिरांच्या दिवाळीवर आर्थिक संकटाचे सावट
- बारामती बसस्थानक परिसरात केरसुणी विक्रेत्यांची व्यथा



बारामती-केदार पाटोळे (दै. आरंभ पर्व)

हिंदू धर्मात दीपावली या सणाला अत्यंत महत्त्वाचे आणि मानाचे स्थान आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरेनुसार हा सण मोठ्या श्रद्धेने, भक्तिभावाने आणि आनंदोत्साहात साजरा केला जातो. घराघरांत दिव्यांची रोषणाई, लक्ष्मीपूजन, फराळ आणि नवीन खरेदीची लगबग सुरू असते. विशेष म्हणजे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरातील केरसुणीला (झाडूला) लक्ष्मीचे प्रतीक मानून तिची मनोभावे पूजा करण्याची परंपरा आजही अनेक घरांमध्ये जपली जाते. मात्र ज्या केरसुणीला लक्ष्मीचे स्थान दिले जाते, त्याच केरसुणीची निर्मिती करणाऱ्या ग्रामीण भागातील कष्टकरी बांधवांच्या श्रमांना बाजारपेठेत मात्र योग्य मोबदला मिळत नसल्याचे विदारक चित्र यंदा बारामती शहरातील बसस्थानक परिसरात पाहायला मिळत आहे.

दिवाळीच्या सणात चार पैसे अधिक मिळतील, कुटुंबाच्या संसाराला हातभार लागेल, मुलांच्या गरजा भागवता येतील आणि वर्षभर केलेल्या कष्टाचे चीज होईल, या आशेने ग्रामीण भागातील अनेक छोटे व्यावसायिक गेल्या चार-पाच महिन्यांपासून केरसुण्या तयार करण्याच्या कामात गुंतले होते. उन्हातान्हात फिरून कच्चा माल गोळा करणे, त्याची निवड करणे, साफसफाई करणे, त्याचे वर्गीकरण करणे आणि स्वतःच्या हातांनी एकेक केरसुणी तयार करणे, यासाठी त्यांना प्रचंड मेहनत घ्यावी लागते. त्यानंतर तयार केलेल्या केरसुण्या विक्रीसाठी ग्रामीण भागातून बारामती शहरात आणल्या जातात. यंदाही अनेक विक्रेते मोठ्या आशेने बारामती बसस्थानक परिसरात दाखल झाले आहेत. मात्र केरसुणीला अपेक्षित भाव मिळत नसल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाची जागा आता चिंतेने घेतली आहे.

दिवाळीच्या काळात केरसुणीला मोठी मागणी असते, या अपेक्षेने या कष्टकरी कुटुंबांनी आधीपासूनच तयारी केली होती. मात्र यंदा ग्राहकांकडून केरसुणीची किंमत कमी सांगितली जात असल्याने विक्रेत्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कच्चा माल मिळविण्यासाठी केलेला खर्च, वाहतूक खर्च, निर्मितीसाठी घेतलेली मेहनत आणि विक्रीसाठी शहरात येण्याचा खर्च पाहता मिळणारा भाव अत्यंत कमी असल्याची खंत विक्रेते व्यक्त करीत आहेत. पदरमोड करून शहरात आणलेल्या केरसुण्या कमी किमतीत विकण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. त्यामुळे चार-पाच महिने घेतलेल्या कष्टाचे पैसे तरी मिळतील का, असा प्रश्न या छोट्या व्यावसायिकांसमोर उभा राहिला आहे.

बसस्थानक परिसरात केरसुणी विक्रीसाठी बसलेल्या विक्रेत्यांशी प्रतिनिधीने संवाद साधला असता त्यांनी आपली व्यथा मांडली. यंदा केरसुणीला भावच मिळत नाही. ग्राहक अत्यंत कमी किंमत सांगतात. अनेक महिने मेहनत करून तयार केलेल्या केरसुण्या विकण्यासाठी शहरात आलो; मात्र अपेक्षेप्रमाणे विक्री होत नाही. दिवाळीत चार पैसे मिळतील, या आशेने केलेली तयारी आता अडचणीत आली आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यातून एक महत्त्वाचा सामाजिक प्रश्न उपस्थित होतो. ज्या केरसुणीला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मीचे प्रतीक मानून श्रद्धेने पूजा केली जाते, त्याच केरसुणीची खरेदी करताना योग्य किंमत देण्याची वेळ येते तेव्हा ग्राहकांकडून एवढी घासाघीस का केली जाते? घरामध्ये पूजेसाठी तिचे महत्त्व असते, मग ती तयार करणाऱ्या गरीब कष्टकऱ्यांच्या श्रमांना बाजारपेठेत महत्त्व का मिळू नये? लक्ष्मीची पूजा करताना त्या लक्ष्मीच्या रूपातील वस्तू तयार करणाऱ्या कष्टकरी हातांचा विचार होणेही तितकेच आवश्यक आहे.

आज बाजारपेठेत आकर्षक पॅकिंगमधील अनेक वस्तू मोठ्या किमतीत विकल्या जातात. ग्राहक त्यासाठी सहज पैसे मोजतात. मात्र स्वतःच्या हातांनी मेहनत घेऊन केरसुणी तयार करणाऱ्या गरीब विक्रेत्याशी दोन-चार रुपयांसाठी घासाघीस केली जाते, ही निश्चितच विचार करण्यासारखी बाब आहे. केरसुणीच्या प्रत्येक काडीमागे त्या कारागिराचे कष्ट, वेळ आणि मेहनत दडलेली असते. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असतो. त्यामुळे केरसुणी खरेदी करताना केवळ स्वस्त वस्तू मिळविण्याचा विचार न करता, तिच्या निर्मितीमागील मेहनतीचा आणि खर्चाचा विचार ग्राहकांनी करणे गरजेचे आहे.

दीपावली हा केवळ घरातील अंधार दूर करून दिव्यांची रोषणाई करण्याचा सण नाही, तर समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा संदेश देणारा सण आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करताना त्या परंपरेमागे मेहनत करणाऱ्या सामान्य माणसालाही सन्मान मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे यंदा लक्ष्मीपूजनासाठी केरसुणी खरेदी करताना विक्रेत्यांशी अनावश्यक घासाघीस न करता त्यांच्या मेहनतीला साजेसा योग्य मोबदला देण्याचा प्रयत्न नागरिकांनी करावा. कारण आपण लक्ष्मीची पूजा करतो; मात्र त्या लक्ष्मीच्या रूपातील केरसुणी तयार करणाऱ्या गरीब कष्टकऱ्यांच्या घरातही दिवाळीचा दिवा तेवढ्याच आनंदाने आणि समाधानाने पेटला पाहिजे. त्यांच्या कष्टाला योग्य किंमत मिळाली, त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले, तरच दीपावलीच्या आनंदाला खरा अर्थ प्राप्त होईल. लक्ष्मीपूजनाबरोबरच लक्ष्मीच्या रूपातील केरसुणी घडविणाऱ्या कष्टकरी हातांचाही सन्मान करूया, हीच यंदाच्या दीपावलीची खरी भावना ठरावी!

थोडक्यात पण महत्वाचे



लोणी काळभोर येथे ८५ पशुपालकांना ४७५ किलो मका बियाण्याचे वाटप

लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग व जिल्हा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पशुवैद्यकीय चिकित्सालय, लोणी काळभोर येथे पशुपालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत मका बियाणे वाटप कार्यक्रमांतर्गत दोन टप्प्यांत एकूण ८५ पशुपालकांना ४७५ किलो मका बियाण्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा परिषद पुणेच्या मा. जिल्हा परिषद सदस्या शितलताई कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी पशुपालकांनी दुग्ध व्यवसायासोबतच चारा उत्पादनाकडे विशेष लक्ष द्यावे, तसेच मका लागवडीद्वारे जनावरांसाठी पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध करून पशुधनाची उत्पादकता वाढवावी, असे आवाहन केले. पशुपालकांना चारा उत्पादनासाठी प्रोत्साहन देणे, जनावरांची चाऱ्याची गरज स्थानिक पातळीवर भागविणे आणि दुग्ध व्यवसाय अधिक फायदेशीर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे अशी माहिती डॉ. गावडे ललिता, पशुवैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय चिकित्सालय लोणी काळभोर यांनी दिली या योजनेअंतर्गत पुढील टप्प्यातील मका बियाणे लवकरच प्राप्त होणार असून, उर्वरित पात्र व नोंदणीकृत पशुपालकांना त्याचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे आयोजन पशुवैद्यकीय चिकित्सालय, लोणी काळभोर यांच्या वतीने करण्यात आले.



कॉग्निझंटने पुण्यात अत्याधुनिक कॅम्पसचे केले अनावरण

पुणे (आरंभ पर्व) : अग्रगण्य AI बिल्डर आणि तंत्रज्ञान सेवा पुरवठादार असलेल्या कॉग्निझंट (NASDAQ: CTSH) ने आज पुण्यातील आपल्या नूतनीकृत आणि अत्याधुनिक कॅम्पसचे उद्घाटन केले. याद्वारे कंपनीची या भागातील प्रतिभावंत आणि नावीन्यपूर्ण परिसंस्थेवरील कटिबद्धता अधिक दृढ झाली आहे. चार ब्लॉक्समध्ये पसरलेला आणि १,३९,००० चौरस फूट क्षेत्रफळ असलेला हा उन्नत कॅम्पस सुरक्षितता, विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि कार्यस्थळावरील कामगिरी उंचावण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामुळे सहकाऱ्यांना काम करण्यासाठी एक आधुनिक आणि भविष्यासाठी सज्ज वातावरण उपलब्ध होईल. "गेल्या दोन दशकांत, आमचे पुणे केंद्र जागतिक उद्योगांना प्रगत तंत्रज्ञान सोल्यूशन्स पुरवणारे एक प्रमुख केंद्र म्हणून विकसित झाले आहे," असे कॉग्निझंट इंडियाचे प्रेसिडेंट (ग्लोबल ऑपरेशन्स) आणि चेअरमन तसेच मॅनेजिंग डायरेक्टर राजेश वॉरियर म्हणाले. "हा उन्नत कॅम्पस आमच्या 'AI बिल्डर'च्या दृष्टीकोनाचे प्रतिबिंब आहे. भविष्यासाठी तयार असलेले हे वातावरण आमच्या सहकाऱ्यांना एकमेकांसोबत काम करण्यासाठी, नाविन्य आणण्यासाठी आणि आमच्या ग्राहकांसाठी अधिक मूल्य निर्माण करण्यासाठी सक्षम करेल." या कॅम्पसच्या नूतनीकरणामुळे बसण्याची क्षमता ९६० वरून १,२७० वर्क सीट्सपर्यंत वाढवली असून विद्यमान परिसराचे सर्वसमावेशक आधुनिकीकरण करण्यात आले आहे. या प्रकल्पात कार्यस्थळाची अंतर्गत रचना, इमारत सेवा, दर्शनी भाग (फसाड) आणि बाह्य परिसर, तंत्रज्ञान पायाभूत सुविधा आणि पूरक सुविधांचा समावेश आहे, ज्यामुळे एक ताजेतवाने आणि समकालीन कार्यस्थळ तयार झाले आहे.



एअरटेल एरिना : डिस्ट्रिक्ट आणि एअरटेलची भागीदारी

बेंगळुरू (आरंभ पर्व) : मनोरंजनाशी संबंधित उपक्रमांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या डिस्ट्रिक्ट आणि एअरटेल यांनी भारतातील लाइव्ह मनोरंजनाचा अनुभव अधिक चांगला आणि सोयीस्कर करण्यासाठी भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीअंतर्गत बेंगळुरूमधील 16 एकर परिसरात असलेल्या खुल्या संगीत कार्यक्रमाच्या ठिकाणाचे नाव बदलून 'एअरटेल एरिना' असे ठेवण्यात येणार आहे. डिस्ट्रिक्ट कार्यक्रमांचे आयोजन आणि प्रेक्षक, कलाकार व आयोजकांचा अनुभव अधिक चांगला करण्यावर लक्ष देणार आहे, तर एअरटेल वेगवान आणि अखंड इंटरनेट सेवा देण्यासाठी आधुनिक डिजिटल सुविधांमध्ये गुंतवणूक करणार आहे. या भागीदारीचा उद्देश केवळ कार्यक्रमाच्या ठिकाणाला नवीन नाव देणे नसून प्रेक्षकांना अधिक चांगला अनुभव देणे हा आहे. कार्यक्रमादरम्यान व्हिडिओ लाइव्ह शेअर करणे, ऑनलाइन पेमेंट करणे आणि मित्र-परिवाराशी संपर्कात राहणे यासाठी चांगली इंटरनेट सुविधा महत्त्वाची आहे. त्यामुळे एअरटेल मोठ्या क्षमतेची डिजिटल सुविधा उभारणार आहे. यामुळे गर्दीच्या वेळीही वेगवान आणि विश्वासार्ह नेटवर्क सेवा मिळेल. तसेच मोबाइलवरून खाद्यपदार्थ आधीच मागवणे आणि कॅशलेस रिचार्ज करणे यांसारख्या सुविधाही अधिक चांगल्या होतील. सुचिता सलवान, चीफ कस्टमर ऑफिसर, एअरटेल यांनी सांगितले की, चांगल्या अनुभवासाठी उत्तम नेटवर्क सुविधा आवश्यक आहे. कार्यक्रमादरम्यान खास क्षणांचे फोटो आणि व्हिडिओ शेअर करणे, डिजिटल पेमेंट करणे तसेच मित्र-परिवाराशी संपर्कात राहणे यासाठी एअरटेलचे प्रगत 5जी नेटवर्क आणि डिजिटल सुविधा प्रेक्षकांचा अनुभव अधिक चांगला करतील.

हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली

कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याची निवडणूक बिनविरोध



कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली; मात्र या निवडीमागील प्रक्रियेवरून उपस्थित झालेले प्रश्न अद्याप कायम आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकल्याचे आरोप, अंतिम मुदतीनंतर अर्ज माघारी झाल्याचा आक्षेप आणि निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांच्या स्पष्टीकरणावरून निर्माण झालेली चर्चा यामुळे निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता ऐरणीवर आली आहे. त्यातच अमोल सुभाष जाधव यांच्या ओबीसी व अनुसूचित जाती प्रवर्गातील कथित दोन जात प्रमाणपत्रांबाबत शरद चितारे यांनी पत्रकार परिषदेत गंभीर आक्षेप नोंदवत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्याचा दावा केला आहे. निवडणूक स्थगित करून फेरनिवडणुकीची मागणीही त्यांनी केली आहे. दुसरीकडे, कारखाना चालविण्याची जबाबदारी बाबुराव बोत्रे-पाटील यांच्याकडे असल्याच्या पार्श्वभूमीवर नव्या संचालक मंडळाचे अधिकार नेमके किती, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. एकेकाळी राज्यात नावाजलेला कर्मयोगी कारखाना अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू झालेला नसताना सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. आता गरज आहे ती आरोप-प्रत्यारोपांची नव्हे, तर जात प्रमाणपत्रांची अधिकृत पडताळणी, निवडणूक प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी आणि कारखान्याच्या भवितव्याबाबत स्पष्ट उत्तरांची! बिनविरोध संचालक मंडळ मिळाले; पण कर्मयोगीला पुन्हा गतवैभव मिळणार कधी?

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

महात्मा फुलेनगर- बिजवडी (ता. इंदापूर) येथील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याची सन 2021-2031 ची पंचवार्षिक निवडणूक राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री व कारखान्याचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि. 4) बिनविरोध पार पडली. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या बुधवार (दि. 4) या आजच्या शेवटच्या दिवशी 21 जागांसाठी 21 उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्याने बिनविरोध निवडीची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.यशवंत माने यांनी केली. कारखान्याच्या बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांमध्ये हर्षवर्धन पाटील, राजवर्धन पाटील आदी मान्यवर उमेदवारांचा समावेश आहे. बिनविरोध निवड झालेले 21 उमेदवार पुढीलप्रमाणे:- पाटील हर्षवर्धन शहाजीराव, पाटील राजवर्धन हर्षवर्धन, शुक्ला राकेश रमेशप्रसाद, सरडे रविंद्र वामन, शिदे शांतीलाल दत्तात्राय, भोगळे छगन धोडीबा, देवकर निलेश शामराव, देवकर राजेद्रकुमार प्रतापराव, काळे संतोष लक्ष्मण, देवकर श्रीकांत खिंवराव, खर्चे विजय विठ्ठल, जाधव पराग रमेशराव, निकम रणजित नामदेव, गायकवाड रोहित राजेद्र, नलवडे बिभिषण कल्याण, शिगाडे अतुल शिवाजी, मोहोळकर वसंत खंडू, पारेकर हरिश्चंद्र सदाशिव, पवार रत्नमाला संपत, व्यवहारे सुमन नारायण, जाधव अमोल सुभाष. सदर निवडणूक बिनविरोध पार पाडणेसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खा.सुप्रिया सुळे, खा.पार्थ पवार, जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे तसेच प्रदीप गारटकर, प्रवीण माने आदी सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद यांचे दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सहकार्य लाभलेबद्दल हर्षवर्धन पाटील यांनी या सर्वांचे आभार व्यक्त केले.

मार्टिन गॅरिक्स सनबर्न अरेनासोबत १० शहरांच्या होळी दौऱ्यासाठी पुन्हा भारतात!

पुणे (दै. आरंभ पर्व)

10 दिवस. 10 शहरे. 10 शो. एक जागतिक ईडीएम सेन्सेशन. या होळीला सनबर्न अरेना मार्च 2027 मध्ये 10 शहरांवर ताबा मिळवण्यासाठी मार्टिन गॅरिक्स यांना पुन्हा भारतात घेऊन येत आहे. यामुळे रंगांच्या या सणाचे रूपांतर संगीत, जल्लोष आणि बेधडक जोशाच्या देशव्यापी उत्सवात होणार आहे. भारतातील काही सर्वात संस्मरणीय डान्स म्युझिक अनुभव देणारी सनबर्न अरेना आणि गॅरिक्स ही जोडी पुन्हा एकदा नवा मापदंड प्रस्थापित करण्यासाठी सज्ज आहे. गॅरिक्स यांची गाजलेली गाणी, रोमांचक प्रॉडक्शन आणि भव्यदिव्य सादरीकरणे आता देशभरातील चाहत्यांपर्यंत पोहोचणार आहेत. या वेळी डान्स फ्लोअर सगळीकडे असेल आणि मनमुराद थिरकण्यासाठी होळी हे निमित्त असेल. 10 मार्च रोजी अहमदाबाद येथून सुरू होणारा हा दौरा 12 मार्चला भुवनेश्वर, 13 मार्चला चेन्नई, 14 मार्चला बंगळुरू, 16 मार्चला शिलाँग, 17 मार्चला कोलकाता, 19 मार्चला हैदराबाद, 20 मार्चला दिल्ली एनसीआर आणि 21 मार्चला मुंबई येथे जाईल, तर 22 मार्च 2027 रोजी पुण्यात त्याची सांगता होईल. या जल्लोषाचा भाग होऊ इच्छिणारे चाहते 4 नोव्हेंबर 2026 रोजी भारतीय वेळेनुसार सायंकाळी 5 वाजल्यापासून मार्टिन गॅरिक्स पेजवर अर्ली ॲक्सेससाठी नोंदणी करू शकतात. नोंदणीकृत वापरकर्त्यांसाठीचा प्री-सेल 16 नोव्हेंबर रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी 12 वाजता सुरू होईल. त्यानंतर 17 नोव्हेंबर 2026 रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी 12 वाजता रुपे कार्डधारकांसाठी विशेष प्री-सेल होईल. दौऱ्याची सर्वसाधारण तिकीट विक्री (जनरल ऑन-सेल) 18 नोव्हेंबर 2026 रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी 12 वाजता केवळ भारतातील आघाडीचे मनोरंजन व्यासपीठ असलेल्या बुकमायशोवर सुरू होईल.



परदेशातील भारतीयांची दिवाळी होणार गोड

- **अवघ्या १४ दिवसांत १,४५७ पार्सल परदेशात रवाना**
- **१० हजार किलो दिवाळी फराळ पोहोचणार प्रियजनां पर्यंत**



पिंपरी (दै. आरंभ पर्व)

परदेशात वास्तव्यास असलेल्या आपल्या प्रियजनांना दिवाळीचा गोडवा पोहोचविण्यासाठी पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरातील नागरिकांनी भारतीय टपाल विभागाच्या दिवाळी फराळ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. अवघ्या १४ दिवसांत तब्बल १ हजार ४५७ पार्सलच्या माध्यमातून सुमारे १० हजार किलो दिवाळी फराळ परदेशात रवाना करण्यात आला आहे. त्यामुळे परदेशात राहणाऱ्या भारतीयांची दिवाळी यंदा घरगुती फराळाच्या गोडव्याने साजरी होणार आहे.

या मोहिमेंतर्गत पिंपरी व चिंचवड पूर्व विभागातून ६७० पार्सलद्वारे ५ हजार २७० किलो फराळ, तर पुणे पश्चिम विभागातून ७८७ पार्सलद्वारे ४ हजार ७३० किलो फराळ पाठविण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून, ही सुविधा २५ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. परदेशात राहणाऱ्या नातेवाइकांना घरगुती फराळ, मिठाई आणि भेटवस्तू पाठविणे सुलभ व्हावे, यासाठी टपाल विभागाने विशेष व्यवस्था केली आहे. पुणे मुख्य डाकघर, मार्केट यार्ड, हडपसर, येरवडा, पिंपरी, चिंचवड मुख्य डाकघर, पीसीएनटी आणि चिंचवडगाव यांसह विविध टपाल कार्यालयांमध्ये पार्सल बुकिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पुणे मुख्य डाकघर आणि चिंचवड मुख्य डाकघर येथे स्वतंत्र पार्सल पॅकेजिंग मशीनची व्यवस्था करण्यात आली आहे. विविध आकारांचे पार्सल बॉक्सही किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांना दिवाळी फराळाची पार्सल पाठविण्यासाठी आणखी एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. रविवार, १ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी असतानाही पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील चार प्रमुख टपाल कार्यालयांत परदेशात दिवाळी फराळ पाठविण्यासाठी पार्सल बुकिंगची सुविधा सुरू ठेवण्यात येणार आहे. टपाल सेवा पुणे क्षेत्राचे निदेशक अभिजीत बनसोडे यांच्या निर्देशानुसार पुणे जीपीओ, चिंचवड मुख्य डाकघर, औंध गाव डाकघर आणि पर्वती डाकघर येथे ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवसाय विकास समूहाचे व्यवस्थापक योगेश वाळुंजकर यांनी केले आहे.

यंदाच्या दिवाळीत परदेशातील तसेच देशांतर्गत प्रियजनांना फराळ आणि भेटवस्तू पाठविण्यासाठी भारतीय टपाल विभागाच्या विश्वासार्ह सेवेचा लाभ घ्यावा. पुणे शहर पूर्व विभागांतर्गत सर्व टपाल कार्यालयांमध्ये विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अत्यंत माफक दरात आणि कमीत कमी वेळेत पार्सल परदेशात पोहोचविण्यासाठी टपाल विभाग सज्ज आहे.

- समीर महाजन, प्रशासकीय अधिकारी तथा प्रवर अधीक्षक डाकघर

लोणावळ्याच्या विकासाला २१ कोटींचा बूस्टर

१३ प्रभागांतील विविध विकासकामांचे आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते भूमिपूजन

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

लोणावळा शहरातील सर्व १३ प्रभागांमध्ये २१ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते संपन्न झाला.

या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी लोणावळा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, उपनगराध्यक्ष देविदास कडू, मुख्याधिकारी अशोक साबळे, बांधकाम समिती सभापती सनी दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. लोणावळा शहरासाठी पुढील तीन वर्षांचा व्यापक विकास आराखडा तयार करण्यात आला असून, या आराखड्यातील सर्व कामे पाच टप्प्यांमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील २१ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे. येत्या महिनाभरात दुसऱ्या टप्प्यातील कामांनाही सुरुवात करण्यात येणार असून, त्यासाठी साधारणतः ३५ ते ४० कोटी रुपयांची विकासकामे मार्गी लावण्याचे नियोजन असल्याचे आमदार सुनील शेळके यांनी सांगितले.



यावेळी बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले की, लोणावळा शहराच्या विकासासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कामे हाती घेण्यात आली आहेत. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, उद्याने, शैक्षणिक सुविधा आणि पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांना प्राधान्य दिले जाणार आहे. पुढील तीन वर्षांत विकास आराखड्यातील सर्व कामे पूर्ण करून लोणावळा शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचा आमचा प्रयत्न राहील.

लोणावळा हे राज्यातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असल्याने शहराच्या मूलभूत सुविधांसोबतच पर्यटन विकासालाही विशेष महत्त्व देण्यात येणार आहे.

शहरातील प्रत्येक प्रभागात आवश्यक विकासकामे पूर्ण करून सुंदर, स्वच्छ आणि समृद्ध लोणावळा घडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वासही आमदार शेळके यांनी व्यक्त केला.

आर्सेलरमित्तलने तिमाहीतील २०२६ चे आर्थिक निकाल जाहीर केले

लक्झेंबर्ग (दै. आरंभ पर्व)



आर्सेलरमित्तल (यापुढे "आर्सेलरमित्तल", "कंपनी" किंवा "ग्रुप" म्हणून उल्लेख) (MT – न्यूयॉर्क, ॲमस्टरडॅम, पॅरिस, लक्झेंबर्ग; MTS – माद्रिद), जगातील आघाडीची एकात्मिक स्टील आणि खाणकाम कंपनी, यांनी आज 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या तीन महिन्यांच्या आणि नऊ महिन्यांच्या कालावधीतील आर्थिक निकाल जाहीर केले. सुरक्षिततेवर विशेष लक्ष: कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता जपणे हे कंपनीचे मूलभूत मूल्य आहे. सुरक्षिततेत सुधारणा करण्यासाठी सुरू असलेला बहुवर्षीय परिवर्तन कार्यक्रम सातत्याने प्रगती करत आहे. यामध्ये अंमलबजावणीतील शिस्त मजबूत करणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण सुरक्षितता कामगिरी सुनिश्चित करणे यावर भर दिला जात आहे. 9M 2026 मध्ये LTIF दर 0.57x होता, तर 9M 2025 मध्ये तो 0.68x होता. उच्च मार्जिनमुळे व्यवसायाच्या कामगिरीतील संरचनात्मक सुधारणा दिसून येते: तिसऱ्या तिमाहीत 2026 मध्ये EBITDA 2.0 अब्ज डॉलर होता, जो वार्षिक तुलनेत 34% अधिक आहे. प्रति टन EBITDA वाढून 155 डॉलर प्रति टन झाला, म्हणजेच वार्षिक तुलनेत 44 डॉलर प्रति टन वाढ झाली. हा स्तर ऐतिहासिक सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे.

जमीन हडपल्याप्रकरणी पानवलकर कुटुंब करणार दौंड तहसील कार्यालयासमोर आत्मदहन



दौंड (दै. आरंभ पर्व)

शिरापूर (ता. दौंड) येथील जमीन व्यवहारात बनावट आधारकार्डचा वापर करून खोटे खरेदीखत नोंदविल्याचा गंभीर आरोप ज्ञानदेव जालिंदर पानवकर (वय ४५) यांनी केला आहे. या प्रकरणात संबंधितांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. पानवकर यांच्या अर्जानुसार, शिरापूर येथील गट क्रमांक ३४६ मधील त्यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या १ हेक्टर ३२ आर क्षेत्राच्या जमिनीबाबत बाळू जयसिंग पानवकर आणि सुरेश जयसिंग पानवकर यांनी २७ मे २०२६ रोजी दौंड दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्रमांक ३८८२/२०२६ अन्वये खरेदीखत नोंदविल्याचा आरोप आहे. मात्र, हे खरेदीखत त्यांच्या वडिलांनी केलेले नसून, दुसऱ्या व्यक्तीला उभे करून बनावट आधारकार्डच्या आधारे दस्त नोंदविण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी १५ जुलै २०२६ रोजी विविध शासकीय कार्यालयांत तक्रार अर्ज दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दौंड पोलिसांनी १५ ऑगस्ट रोजी दिलेल्या पत्रात प्रथमदर्शनी गुन्हा घडल्याचे आढळून येत असल्याचे नमूद केल्याचा दावाही अर्जात करण्यात आला आहे. मात्र, दुय्यम निबंधक कार्यालयाकडून गुन्हा दाखल करण्याबाबत टाळाटाळ होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, संबंधित खरेदीखताच्या आधारे जमिनीचा फेरफार मंजूर करण्यासाठी अर्ज करण्यात आल्याने आपली जमीन हातातून जाण्याची भीती पानवकर यांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करावा, वादग्रस्त खरेदीखताची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अन्यथा अर्जाच्या तारखेपासून १५ दिवसांनंतर तहसील कार्यालयासमोर कुटुंबासह आत्मदहन करणार असल्याचा इशारा त्यांनी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आपणही बना आमच्या टीमचा भाग !

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!

आपली ओळख करा... आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या जाहिरातींसाठी
विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व
सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती
आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यत पोहोचवण्यासाठी
आजच संपर्क साधा!

संपर्क :
प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल :
aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"